# नव महाराष्ट्र संघ



**श्री. अरूण बोडस**

गुरूवर्य पाटणकर सरांच्या प्रयत्नांमुळे २६ जानेवारी १९६० रोजी नव महाराष्ट्र संघ या खोखो संघाची स्थापना पुण्यात झाली. सर शाळेत शिक्षक असल्यामुळे मधल्या सुट्टीत पळण्याच्या स्टाईलवरून मुलांना खोखोच्या क्रिडांगणावर बोलावून आणीत असत व पाटणकर सरांचे संस्कार व शिकवण्याची पध्दत व त्यांचे त्यावेळचे दिग्गज साथीदार (नावे) ..... यांच्या प्रयत्नांमुळे नव महाराष्ट्र संघ लवकरच खोखो क्षेत्रात आपला ठसा उमटवू लागला. नू.म.वि. प्रशाला व स. प. महाविद्यालय विशेषतः या संस्थांमधील विद्यार्थ्यांना त्याचा मोठाच फायदा झाला. सरांचाच कित्ता गिरवत नंतर हे कार्य गुरुवर्य मोडक सर यांनी पण हे कार्य व नव महाराष्ट्र संघाचा झेंडा कायम उंचावत राहील याची काळजी घेतली.

या दोघांव्यतिरिक्त संस्थापक सदस्य गुरुवर्य दिनकर सर, कवठेकर सर, साठ्ये सर यांनी खेळाबरोबरच संस्थेच्या इतर घडमोडींबाबत म्हणजेच संस्थेची घटना व उद्दिष्टे याबाबतही महत्वपूर्ण योगदान दिले व ज्या दूरदृष्टीने सर्व गोष्टी नमूद करून ठेवल्या आहेत त्याचा संघाच्या जडणघडणीत व उत्कर्षात महत्वाचा वाटा होता.

खोखोच्या प्रथम राष्ट्रीय स्पर्धेपासून ते आजतागायत सर्व राष्ट्रीय स्पर्धांमधून नव महाराष्ट्रचे खेळाडू कायम अग्रेसर राहिले व सर्व पुरस्कारांवर आपले वर्चस्व सिद्ध केले.

नव महाराष्ट्र संघाने प्रथमपासूनच संघ जिवंत ठेवण्याचे काम केले. दुर्दैवाने त्यावेळच्या गुजरात व मध्यप्रदेशमधील नामवंत संघ हे काम करू शकले नाहीत अन्यथा खोखोचे आजचे चित्र वेगळे दिसले असते. संस्थेच्या क्रीडांगणावर सरावासाठी येणाऱ्या सुमारे पन्नास खेळाडूंना रु. २,००,०००/- लाखाचे विमा कवच (Personal Accident and Mediclame) संस्थेच्या वतीने २०१०-११ पासून दिले जाते.

१९७१ पासून दर ३-४ वर्षांनी अखिल भारतीय खोखो स्पर्धा भरविण्याचा संकल्प नव महाराष्ट्र संघाने केला व प्रत्येक स्पर्धेत मग ती कोणत्याही महिन्यात आयोजित केली तरी वरुणराजाने कायमच आपली उपस्थिती लावली. अपवाद एखाद-दोन स्पर्धांचा पण नव महाराष्ट्रची स्पर्धा व वरुणराज यांचे अतूट नाते आंतरमहाविद्यालयीन स्पर्धांचे वेळी पण कायमच राहिले व त्यातूनच निसर्गावर मात करण्यास सज्ज राहणारी कार्यकर्त्यांची फौज कायमच तयार होऊ लागली.

प्रत्येक स्पर्धा भरविताना काहीतरी नवीन करण्याचा पायंडा यातूनच पुढे आला, म्हणूनच खोखो क्षेत्रात नव महाराष्ट्र संघाची स्पर्धा उपस्थित राहून अनुभवण्यासाठी सर्व खेळाडू आसुसलेले असतात.

प्रत्येक गोष्टीचे व्यवस्थित नियोजन, वेळेचे महत्व हे टिकविताना प्रसंगी प्रमुख पाहुणे उशिरा आले तरी उद्घाटन समारंभ ठरल्या वेळी पार पाडण्याची घटना फक्त नव महाराष्ट्र संघच करू जाणे. एक खाजगी संस्था एवढ्या मोठ्या स्पर्धा भरवू शकते असे एकमेवाद्वितीय उदाहरण फक्त खोखो मध्येच नव महाराष्ट्रच्या रूपाने दिमाखात उभे आहे.

१९९३ पासून रोख पारितोषिके, प्रत्येक संघाला प्रायोजक, प्रत्येक संघाला टॉप टू बॉटम संपूर्ण कीट, खेळाडूंसाठी उपयुक्त व कॅलरीजची गरज ओळखून केलेली भोजन व्यवस्था, राहण्याची व्यवस्था हॉटेल्समधून, इलेक्ट्रॉनिक व नंतर कॉम्प्यूटराईज्ड स्कोअर बोर्ड, LED wall व त्यावर Live प्रक्षेपण, प्रत्येक मॅचनंतर रोख पारितोषिक वितरण समारंभ, आजच्या युगातील webcasting संपूर्ण स्पर्धेचे Youtube वरून, खोखोची प्रथमच Live Text Comentry वैयक्तिक सर्वोत्कृष्ट पारितोषिका सोबतच स्पर्धेतील Average Performance